दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ रे : अंक : १ पुणे, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ | RNI NO.MAHMAR2022/87390 | पाने : ४ किंमत : ३.००

VOL NO.04. ISSUE : 1 Pune, Monday, 18 August 2025 | Pages : 4 PRICE : 3.00

# दैनिक महा मेट्रो चा चौथा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

## विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार



















**१. पक्षी निरीक्षक दीपक शिंदे यांचा सत्कार करताना माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सावंत, २. माजी सहाय्यक पोलीस आयुक्त प्रसाद हसबनीस यांचा मानपत्र देऊन सत्कार करताना डावीकडून राजकुमार गायकवाड, संजय सोमवंशी, हसबनीस, सोमनाथ नजन, सुदाम विश्वे या शिक्षकांनी त्यांचा सत्कार करताना, ३. दीपक सावंत यांच्याकडून कृषी अधिकारी सुधीर गांगर्डे कुटुंबासमवेत मानपत्र स्वीकारताना ४. संजय पाठारे मार्गदर्शन करताना ५. आजम शेख सुधाकर भावसार यांना मानपत्र देताना ६. युवा उद्योजक व मोबाईल कॉर्नरचे मालक सुधीर वाघमोडे मार्गदर्शन करताना**

**पुणे । प्रतिनिधी**

येरवड्यातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे कलारंग मंदिरात दैनिक महा मेट्रोचा वर्धापन दिन संपन्न झाला. यावेळी माजी सहाय्यक पोलीस आयुक्त प्रसाद सबनीस, माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सावंत, एएम इन्फोवेब कंपनीचे संचालक आजम शेख, युवा नेते सुरेंद्र पठारे, युवा उद्योजक व कॅार्नर मोबाईलचे मालक सुधीर वाघमोडे उपस्थित होते. यावेळी येरवडा खुले कारागृहाते कृषी अधिकारी सुधीर गांगर्डे यांचा आजम शेख , दीपक सावंत यांनी मानपत्र देऊन सत्कार केला. त्यााच्यासह माजी नगरसेविका सुलभा क्षीरसागर, इतिहास अभ्यासक समीर निकम, पक्षी निरीक्षक दीपक शिंदे, आदर्श शिक्षिका वैशाली खांदवे शिक्षक संजय सोमवंशी, राजकुमार गायकवाड दलित साहित्यिक सुरेश पाटोळे, पर्यावरण प्रेमी निलेश व प्रियंका रोकडे, चाटे कोचिंग क्लासेस संचालक महेश ढवाळे, दलित मित्र बाळासाहेब खोत, सामाजिक कार्यकर्त्या ॲड असुंता पारधे, पौर्णिमा गादिया, विधी संघर्षित मुलांसाठी कार्यकरणारे संदेश बोर्डे , व्यंगचित्रकार मंदार नाईक सामाजिक कार्यकर्ते अरुण जंगम, लक्ष्मण काशीतकर, गणेश गायमुक्ते, गण लक्ष्मी पतसंस्थेचे सुनील लोखंडे, पर्यटन व विमा क्षेत्रात काम करणारे सुधाकर भावसार, सामाजिक कार्यकर्ते **पान ३ वर...**

## येरवड्यात काम करणे आव्हानात्मक -माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सावंत

**पुणे । प्रतिनिधी**

पोलीस खात्यात काम करताना राज्यातील विविध शहरात काम केले. मात्र येरवड्यातील काम आव्हानात्मक असल्याची कबुली माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सावंत यांनी दिली. येरवड्यातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे कलारंग मंदिरात दैनिक महा मेट्रोच्या चौथ्या वर्धापन दिनी निमित्त झालेल्या कार्यक्रमात सावंत बोलत होते. यावेळी माजी सहाय्यक पोलीस आयुक्त प्रसाद हसबनीस, एएन इन्फोवेबचे संचालक आजम शेख , युवा नेते सुरेंद्र पठारे, उद्योजक सुधीर वाघमोडे उपस्थित होते.

सावंत म्हणाले, येरवडा पोलीस ठाण्याचा कार्यभार प्रसाद हसबनीस यांच्याकडून स्विकारला त्यांनी चांगले काम केले होते. त्यामुळे पोटात गोळा आला होता. त्यांच्यापेक्षा चांगले काम करण्याचे आव्हान होते. एका दंगलीत लाठी चार्ज केला तेव्हा काही अघटित घडेल कि काय याचा विचार आला होता. मात्र पत्रकारांनी वातावरण शांत झाल्याचे सांगितले. त्यामुळे आत्मविश्वास वाढला. अनेक तपास कार्यात येरवड्यातील नागरिकांनी मदत केली. त्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात यश आले. चांगल्या कामाची पावती म्हणजे आजही अनेक जण फोन करतात.

हसबनीस म्हणाले , येरवड्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी येथील रहिवाशांची मदत झाली. डंपर चोरीची आंतराज्यातली टोळी पकडली ते येथील नागरिकांच्या सतर्कतेमुळे. येरवड्यातीस जनतेने खूप प्रेम दिले. आता येरवडा पूर्णपणे बदलला आहे. याचे श्रेय पोलीस अधिकाऱ्यांना काही प्रमाणात जाते.

## खाकी वर्दीवर प्रेम करणारा आयटी क्षेत्रातील उद्योजक - एएम इन्फोवेबच्या माध्यमातून दोन हजार युवकांना रोजगार

**पुणे । प्रतिनिधी**

आजम शेख यांचा खेडेगावातील शेतकरी कुटुंबातील जन्म, त्यांना दोन बहिणी. लहानपणापासून आई-वडिलांचे संस्कार घेऊन वाढले. मामाच्या गावाला (आजोळी) राहून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. पदवी, एमबीए, यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचा बालमित्र, आत्तेभाऊ आणि गुरू असलेले अली मर्चेट यांनी आजम यांच्यामधील टॅलेंट ओळखले होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी आयपीएस अधिकारी न होता व्यवसायात सहभागी होण्याचा सल्ला दिला. ऐन तारुण्यात दोघांनी कंपनी उच्च स्तरावर नेवून ठेवली आहे. एएम इन्फोवेब कंपनीमध्ये आज रोजी दोन हजार युवक-युवती कार्यरत आहेत.

आजम शेख यांचे शिक्षण १ ते ७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनेगाव, ता.केज, जि. बीड ८ ते १२ जोधा प्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंबेजोगाई, जि. बीड कॉम्प्युटर इंजिनिअर पदवी लातूर एमबीए - पुणे

**नोकरी....**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आयबीएम आणि टाटा कंपनीमध्ये अडीच वर्षे नोकरी.

**अली मर्चंट...**

अली मर्चंट हे आजम शेख यांचे नात्याने आत्तेभाऊ (मूळचे रा. भावनगर, गुजरात), मोठा भाऊ, मित्र, मेन्टोर, गुरू आहेत. पण, नात्यापेक्षा दोघांमध्ये फुलली ती अधिक मैत्री. अली मर्चेंट यांच्याविषयी सांगायचे म्हटले तर मित्र, भाऊ यापेक्षा



सर्वात मोठे म्हणजे गुरू आहेत, असे आजम शेख सांगतात. अली मर्चेंट आणि आजम शेख हे एएम इन्फोवेब कंपनीचे संचालक आहेत. अली मर्चेंट यांच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती चांगली. पण, घरामधून एक रुपयाही न घेता ऐन तारुण्यात घराबाहेर पडले. गुजरातमध्ये जाऊन व्यवसायाच्या माध्यमातून मोठी भरारी घेतली, ऐन विशीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपनीचे, हॉटेलचे मालक बनले. परंतु, चुकीच्या माध्यमातून पैसा मिळवत असल्याचे वडिलांनी निदर्शनास आणून दिले, कमावलेले सर्व दान करून सरळ मार्गाने काम करण्याचे ठरवले. व्यवसायाच्या माध्यमातून उभारलेली संपूर्ण रक्कम सामाजिक संस्थाना दान केली आणि मोकळ्या हाताने माघारी आले..

**ए एम इन्फोवेब कंपनीची उभारणी...**

स्वतःचे काही पैसे जवळ राहिले नव्हते. पुढे काय? हा प्रश्न तर होताच. काही झाले तरी स्वबळावर उभे राहण्याचा निर्धार केला. २०११ मध्ये पुणे शहर गाठले. एका फ्लॅटमध्ये राहून संगणकाच्या माध्यमातून आयटी व्यवसायाला सुरवात केली. अमेरिकनस्थित काम असलेल्या कंपनीची कोट्यवधी रुपयांची उलाढाल आहे. अमेरिकेतील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे काम कंपनी करत आहे. कंपनीच्या माध्यमातून अनेक नागरिकांचे जीव वाचविण्याचे काम कंपनी करत असल्यामुळे मोठे समाधान मिळत असल्याचे आजम शेख सांगतात.

**खाकीचे आकर्षण अन् स्पर्धा परीक्षा...**

आजम शेख यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक चित्रपट त्यांच्या पाहण्यात आला होता. चित्रपटात मुख्य अभिनेत्याची पोलिस अधिकाऱ्याची भूमिका होती. खाकी वर्दी, बुलेट आणि अभिनेत्याचा रुबाब पाहून आपणही पोलिस अधिकारी व्हावे का? असा विचार आजम शेख यांच्या मनात आला. कारण, खाकी वर्दीची तर पहिल्यापासून आवड तर होतीच. पोलिस अधिकारी होण्यासाठी काय करावे लागते? याबाबतची माहिती घेण्यास सुरुवात केली. एका उच्च आयपीएस अधिकाऱ्याकडून प्रेरणा घेतली. कोणताही क्लास न लावता घरच्या घरी अभ्यास करत पोलिस कॉन्स्टेबल, पीएसआय आणि यूपीएससी २०१४-१५ मध्ये परीक्षा दिली. विशेष म्हणजे तिन्ही परीक्षा उत्तीर्ण झाले. आयपीएसची पुढे प्री आणि मेन्स या दोन्ही परीक्षाही उत्तीर्ण झाले. आयपीएस अधिकारी होऊन देशसेवा करायची हे ठरले, खाकी वर्दी अंगावर चढण्याचे स्वप्न पडू लागले. कारण, आयपीएस परीक्षा उत्तीर्ण झाले होते. फक्त मुलाखत बाकी होते. मात्र त्यांनी आपल्या व्यवसायात लक्ष दिले.

## झेड.एस.आय. शास्त्रज्ञांना पश्चिम घाटातील झाड उंदराचे प्राचीन मूळ शोधण्यात यश


## मलबार काटेरी झाड उंदराच्या पूर्वजांची उत्पत्ती इओसीन काळात (५६ ते ३३.९ दशलक्ष वर्षांपूर्वी)

**पुणे । प्रतिनिधी**

पहिल्यांदाच, भारतीय प्राणी सर्वेक्षण (ZSI) च्या शास्त्रज्ञांनी पश्चिम घाटातील स्थानिक मलबार काटेरी झाडउंदराचे (प्लॅटाकॅन्थोमिस लॅसियुरस) डीएनए बारकोड तयार केले आहेत, यामुळे त्याची उच्च पातळीची वर्गीकरण स्थिती स्पष्ट होण्यास मदत होईल. भारतीय प्राणी सर्वेक्षणाच्या प्रादेशिक केंद्रांमधील शास्त्रज्ञांच्या सहयोगी प्रयत्नांपैकी हे एक आहे. झेड. एस. आय, पश्चिम प्रादेशिक केंद्रातील डॉ . श्यामकांत तलमले, डॉ. के. पी. दिनेश, शबनम अन्सारी, झेड एस आय , पश्चिम घाट प्रादेशिक केंद्रातील डॉ. जाफर पालोट आणि दक्षिण प्रादेशिक केंद्रात कार्यरत डॉ. के. ए. सुब्रमण्यन यांनी इराणमधील लोरेस्तान विद्यापीठातून प्रकाशित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध पीअर-रिव्ह्यूड जर्नल, जर्नल ऑफ ॲनिमल डायव्हर्सिटीच्या नवीन अंकात संयुक्तपणे हा निष्कर्ष प्रकाशित केला आहे.

मलबार काटेरी झाडउंदीराचे वैज्ञानिकदृष्ट्या प्लॅटाकॅन्थोमिस लॅसियुरस म्हणून ओळखले जाणारे वर्णन १८५९ मध्ये करण्यात आले होते, परंतु या प्रजातीचा उत्क्रांती इतिहास समजून घेण्यासाठी अनुवांशिक डेटा तयार करण्यासाठी जवळजवळ १६६ वर्षे लागली. आण्विक डेटिंगसाठी उत्क्रांतीवादी अभ्यासांवरून असे दिसून येते की सध्याच्या मलबार काटेरी झाडउंदराच्या पूर्वजांची उत्पत्ती इओसीन काळात (५६ ते ३३.९ दशलक्ष वर्षांपूर्वी) झाली होती, तर प्लॅटाकॅन्थोमिस हा कदाचित पश्चिम घाटात टिकून राहिलेला गोंडवानन अवशेष आहे. सारख्या दिसणाऱ्या चिनी पिग्मी डोर्माउस, ज्याला वैज्ञानिकदृष्ट्या टायफ्लोमिस म्हणून ओळखले जाते, ते चीन आणि व्हिएतनाममधील एकाकी ठिकाणी आढळते. चिनी पिग्मी डोर्माऊसचे पूर्वज मायोसीन काळात (२३ ते ५.३ दशलक्ष वर्षांपूर्वी) वेगळे झाले. सध्याचा प्लॅटाकॅन्थोमिस वंश हा पश्चिम घाटाच्या टेकड्यांमध्ये आश्रय घेणारा अवशेष असू शकतो ज्यांचे पूर्वज भूतकाळातील विविध भूगर्भीय घटनांमुळे नामशेष झाले असतील.

फायलोजेनेटिक अभ्यासामध्ये असे दिसून आले कि दोन्ही प्रजाती (प्लॅटाकॅन्थोमीस आणि टायफ्लोमीस) मोनोफायलेटिक नाहीत, जे त्यांच्यासाठी स्वतंत्र कौटुंबिक स्थानाचे समर्थन करते. दक्षिण पश्चिम घाटातील एका मोहिमेत, सर्वेक्षण पथकाला केरळमधील सूर्यमुडीजवळ लहान सस्तन प्राण्यांच्या सर्वेक्षणादरम्यान मलबार काटेरी झाडउंदीर आढळला. आण्विक अभ्यासानंतर, नमुना पुढील अभ्यासासाठी भारतीय प्राणी सर्वेक्षण (ZSI), पश्चिम प्रादेशिक केंद्र (WRC), पुणे येथील राष्ट्रीय प्राणी संग्रहालय (NZC) येथे जमा करण्यात आला आहे. भारतीय प्राणी सर्वेक्षण विभागाच्या संचालिका डॉ. धृती बॅनर्जी यांचे याबद्दल म्हणणे आहे कि वेगवान हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्लॅटाकॅन्थोमिस सारख्या ऐतिहासिकदृष्ट्या वर्णन केलेल्या गूढ प्रजातींवर नवीन वैज्ञानिक संशोधन आवश्यक आहे. संवर्धन धोरणांची माहिती देण्यासाठी आणि प्रजातींचे दीर्घकालीन अस्तित्व सुनिश्चित करण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन महत्त्वाचे आहेत. प्रमुख लेखक डॉ. श्यामकांत तलमले यांच्या मते, पश्चिम घाटातील मलबार काटेरी झाडउंदरांसाठी अधिवासाचा ऱ्हास हा मुख्य धोका आहे. ही प्रजाती ५० मीटर ते २२७० मीटर उंचीवर आढळते आणि तिच्या विस्कळीत वितरणामुळे IUCN रेड लिस्टमध्ये असुरक्षित (Vulnerable) म्हणून सूचीबद्ध आहे. वन्यजीव (संरक्षण) सुधारणा कायदा, २०२२ च्या अनुसूची II अंतर्गत देखील हे संरक्षित आहे, जे लक्ष्यित अधिवास संवर्धनाची गरज अधोरेखित करते. अभ्यासाचे सह-लेखक डॉ. के. ए. सुब्रमण्यन म्हणतात या अभ्यासातून दक्षिण पश्चिम घाटातील जीवजंतूंच्या प्राचीन वंशाचे अस्तित्व उघड होते, ज्यामुळे गोंडवाना खंडाच्या विघटनाच्या वेळी उष्णकटिबंधीय आश्रयस्थान म्हणून त्यांची भूमिका स्पष्ट होते. मलबार काटेरी झाडउंदीर हा पश्चिम घाटातील एक दुर्मिळ स्थानिक प्राणी आहे, असे सहलेखक डॉ. जाफर पालोट ह्यांनी सांगितले. वर्षानुवर्षे फील्डवर्क करूनही, मी ते फक्त काही वेळा पाहिले आहे. सूर्यमुडी, अरलम वन्यजीव अभयारण्यात एक ताजा नमुना पाहण्याची ही एक दुर्मिळ संधी



होती. त्याच्या डीएनएचे उलगडा करणे विशेष होते, ज्यामुळे त्याचे प्राचीन मूळ उघड झाले आणि त्याच्या नाजूक अधिवासाचे संरक्षण करण्याची तातडीची गरज अधोरेखित झाली. डॉ. के. पी दिनेश यांनी यावर भर दिला कि मलबार स्पायनी ट्री माऊस सारख्या अवशेष प्रजातींसाठी डीएनए बारकोडिंग आणि फायलोजेनेटिक्स सारखी आण्विक साधने महत्त्वाची आहेत, जी उत्क्रांतीचा इतिहास उघड करतात आणि पश्चिम घाट सारख्या जैवविविधतेच्या हॉटस्पॉट्समध्ये अचूक वर्गीकरण आणि संवर्धनास मदत करतात.